ePaper

शिंदे गटाला मनसे रसद?; शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यासाठी हालचाली!



| वर्ष - 6 | अंक - 145 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

बाप्पा मोरया...

www.mahaenews.com | शुक्रवार | दिनांक 2 सप्टेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



सध्या बारामतीत जी विकास कामे चालू आहेत. ते टेंडर काढण्यात रस आहे, म्हणून चालली आहेत काय? बाहेरच्या व्यक्तीने येऊन उचलली जीभ लावली टाळ्याला, हा जरी त्यांचा अधिकार असला तरी त्याला किती महत्त्व द्यायचं हा बारामतीकरांचा अधिकार आहे. मी ज्या दिवसापासून बारामतीचे प्रतिनिधित्व स्वीकारले आहे. तेव्हापासून आजपर्यंत कोणत्याही कामाच्या टेंडरमध्ये पाच पैशाचाही मिंधा नाही.

**- अजित पवार, राष्ट्रवादी नेते**

एका महिलेला मारहाण करण्यात आल्याचा व्हिडिओ व्हायरल होत आहे. संबंधित प्रकरणी पोलिसांना कडक कारवाई करण्याबाबत पत्राद्वारे कळवण्यात आलं आहे. संवादाच्या माध्यमातून वाद मिटवायला हवा होता. असा कायदा हातात घेणे चुकीचं आहे. आरोपीवर कडक कारवाई करण्याची मागणी पोलिसांकडे केली आहे. महिलेला मारहाण करणारी व्यक्ती ही आरोपी आहे. कारवाई केली पाहिजे. **-रुपाली चाकणकर, राज्य महिला** आयोगाच्या अध्यक्षा



# सेवा केंद्रातच नागरिक, विद्यार्थ्यांची आर्थिक लूट!

## जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार, आ. लक्ष्मण जगताप यांची दोषी केंद्रचालकांवर कारवाईची मागणी

**पिंपरी-चिंचवड ।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

पुणे व पिंपरी-चिंचवड शहरातील महा-ई-सेवा केंद्रांकडून विद्यार्थी, नागरिकांची मोठ्या प्रमाणात आर्थिक लूट होत असल्याची तक्रार भाजपचे आमदार लक्ष्मण जगताप यांनी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्याकडे केली आहे. दोषी केंद्रचालकांवर कारवाई करावी, अशी मागणी जगतापांनी केली आहे.



पुणे जिल्ह्यासह या दोन्ही शहरातील महा-ई-सेवा केंद्रे म्हणजे नागरिकांना लुटणारी केंद्रे बनली आहेत. शैक्षणिक व विविध शासकीय योजनांसाठी आवश्यक दाखले देण्यासाठी या केंद्रांवर निश्चित केलेल्या दरांपेक्षा कितीतरी पटीने पैसे घेतले जात आहेत. विद्यार्थी, पालकांसह सर्वसामान्य नागरिकांची प्रचंड लूट सुरू आहे, याकडे आमदारांनी जिल्हाधिकाऱ्यांचे एका निवेदनाद्वारे लक्ष वेधले आहे.

पुणे व पिंपरी पालिका क्षेत्रातील महा-ई-सेवा केंद्रातून विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी आवश्यक असणारे उत्पन्नाचे, जातीचे, अधिवास, नॉन क्रिमिलेअर आदी विविध दाखले तसेच विविध शासकीय योजनांकरिता ४२ प्रकारचे दाखले वितरीत केले जातात. महा-ई-सेवा केंद्र चालकांकडून निश्चित शुल्क दरापेक्षा जास्त पैसे आकारले जात असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. काही महसूल कर्मचारीही प्रत्येक दाखल्यामागे महा-ई-सेवा केंद्र चालकाकडून शुल्क घेतात. तहसील कार्यालयात असणाऱ्या सेतू केंद्रातही अशा प्रकारे पैसे आकारत असल्याच्या तक्रारी आहेत.

### केंद्र चालकांच्या मनमानी कारभाराला लगाम बसावा

अनेक सेवा केंद्र हे मंजूर असलेल्या कार्यक्षेत्राव्यतिरिक्त इतर कार्यक्षेत्रातही कार्यरत आहेत. काही सेवा केंद्रचालकांनी दुबार केंद्र इतर कार्यक्षेत्रात नियमबाह्यरित्या सुरु केले आहे. तर, काही सेवा केंद्रचालकांकडून परस्पर त्याच नावाने दुसरीकडेही अनधिकृतपणे केंद्र चालवण्यासाठी दिल्याचे दिसून येते. सेवा केंद्रात सीसीटीव्ही कॅमेरे सक्तीचे करून त्यामार्फत केंद्र चालकांच्या मनमानी कारभाराला लगाम घालावा. नागरिकांच्या दाखल्यासाठी सशुल्क रक्कम ऑनलाईन भरण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारावी, कायमस्वरूपी दक्षता पथक नेमण्यात यावे व त्या पथकामार्फत नियमित तपासणी व धडक कारवाई करावी, अशी मागणी जगतापांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

# मराठा सेवा संघाने महाराष्ट्राला दिली सांस्कृतिक दिशा !

## थेरगाव येथे मराठा सेवा संघाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**पिंपरी।**
**। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

१९९० सालापासुन मराठा सेवा संघ ही पुरोगामी विचारधारेची ढाल आणि विकृतीवर आक्रमकपणे वार करणारी तलवार अशी ओळख धारण करणारी संस्था आहे. मराठा सेवा संघाने महाराष्ट्राला सांस्कृतिक दिशा दिली, असे प्रतिपादन मराठा सेवा संघाच्या उद्योग कक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश जाधव यांनी केले. मराठा सेवा संघाचा 32 वा वर्धापन दिन थेरगाव येथील राजमाता जिजाऊ सभागृहात उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मराठा सेवा संघाच्या उद्योग कक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश जाधव मराठा सेवा संघाच्या कार्याचा आढावा देताना बोलत होते.

कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदना घेऊन करण्यात आली. या वेळी राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला मराठा सेवा संघाचे अशोक सातपुते, गजानन आढाव, मंगेश चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. प्रकाश जाधव म्हणाले



की, मराठा सेवा संघाने धार्मिक, जातीय विद्वेषातुन दगडे उचलणाऱ्या युवकांच्या हातात वैचारिक पुस्तके दिली. महाराष्ट्रातील जातीय सलोखा वाढविला. इतिहासाच्या पुनर्लेखनाची चळवळ उभा करुन इतिहासाचे विकृतीकरण रोखले. महापुरुषांचे विचार घराघरापर्यंत घेऊन जाणाऱ्या लेखक, वक्ते, शाहीर, कलाकारांची मोठी फळी निर्माण केली. लेखकांना वाचकवर्ग दिला. वक्त्यांना श्रोतावर्ग दिला. कलाकारांना प्रेक्षकवर्ग दिला. महाराष्ट्राला वैचारिकवर्ग दिला. धार्मिक गोष्टींचा विचार करताना धर्माचा उदात्त विचार सांगणारी "शिवधर्म गाथा" दिली. समाजातील सांस्कृतिक दहशतवाद संपविण्यासाठी समाजाला सांस्कृतिक वारसा आणि बुद्ध-तुकोबा-शिव-फुले-शाहू-आंबेडकर ही साखळी समजावुन सांगितली, असे प्रकाश जाधव म्हणाले.

संभाजी ब्रिगेडचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष सतीश काळे म्हणाले की, मराठा सेवा संघाचे कार्य प्रत्यक्षात जितके दिसून येते, तितकेच अप्रत्यक्ष महाराष्ट्रातील सर्व समाजघटकांवर मराठा सेवा संघाच्या चळवळीचा प्रभाव पडला आहे. आज माझ्यासारखे अनेक जण वेगवेगळ्या विषयांवर निर्भीडपणे व्यक्त होतात. त्यासाठी मराठा सेवा संघाचा खूप मोठा वैचारिक आधार राहिलेला आहे. पुरोगामी विचारांची नाळ बळकट करून विचारांनी एक असलेल्या साथीदारांना एकत्र आणण्याचे काम मराठा सेवा संघ करत आहे. त्यामुळे वैचारिक क्रांती होणार हे मात्र नक्की.

# लोकसंख्येचा विचार करता पुण्याच्या 2 महापलिका व्हायला हव्यात!

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन

**पुणे ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

शहराचा विचार केला तर पुणे महानगरपालिका ही आकाराने राज्यातीलच नव्हे तर देशातील सर्वात मोठी महापालिका ठरली आहे. आकाराचा आणि लोकसंख्येचा विचार करता पुण्याचे दोन भाग व्हायला हवेत, अशी भूमिका उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज पुण्यात मांडली.

गेल्या काही वर्षात पुणे महापालिकेत २३ नव्या गावांचा समावेश झाला आहे. त्यामुळे पुणे एक मोठे महानगर झाले आहे. मात्र, त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. पुण्याचे दोन भाग करण्याची माझी भूमिका राजकीय नाही. मात्र, कोणतेही युनिट जितके छोटे तितके काम करायला अधिक सोपे असते, असा अनुभव आहे, असे पाटील यांनी स्पष्ट केले. गोवा राज्य छोटे असल्याने तिथल्या लोकप्रतिधींचा सर्वांशी वैयक्तिक संबंध येतो. त्यातून प्रश्न लवकर सुटण्यास मदत होते.तिथला मुख्यमंत्री बायकोने सांगितले की मासळी बाजारात जाऊन मासेवाल्याला जाऊन भेटतो. छोटे राज्य असल्याने हे सारे शक्य असल्याचे पाटील यांनी स्पष्ट केले.



### चार विद्यापीठांच्या कुरूगुरुंची निवड प्रक्रिया होणार...

विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या नियुक्त्या करताना जुन्या विद्यापीठ कायद्यानुसार केल्या जातील. नवा कायदा अस्तित्वात नाही. राज्यपालांनी नव्या कायद्यावर स्वाक्षरी केलेली नाही. सध्या जुना विद्यापीठ कायदा अस्तित्वात असल्याने या कायद्यानुसार चार विद्यापीठांच्या कुरूगुरूंची निवड प्रक्रिया होईल, असे पाटील यांनी सांगितले.

चांदणी चौकातील वाहतुकीबाबत बोलताना ते म्हणाले, " चांदनी चौकामध्ये रस्ता सहा लेनचा होत नाही तोपर्यंत मोठ्या गाड्यांना बंदी हे उत्तर नाही. मोठ्या वाहनांना एका लेनमधून जाण्यासाठी परवानगी द्यायला हवी, असे त्यांनी सांगितले. दोन स्वतंत्र लेन छोट्या चारचाकी वाहनांसाठी दिल्या तर त्या गाड्या लवकर जातील आणि दुसऱ्या लेनमधून टेम्पो-ट्रक जाऊ शकतील."

> गेल्या काही वर्षात पुणे महापालिकेत २३ नव्या गावांचा समावेश झाला आहे. त्यामुळे पुणे एक मोठे महानगर झाले आहे. मात्र, त्यामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. पुण्याचे दोन भाग करण्याची माझी भूमिका राजकीय नाही. मात्र, कोणतेही युनिट जितके छोटे तितके काम करायला अधिक सोपे असते, असा अनुभव आहे, असे पाटील यांनी स्पष्ट केले



# जिल्ह्यात १३३ जणांना नव्याने करोना संसर्ग

**पुणे ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

गुरुवारी दिवसभरात जिल्ह्यातील १३३ जणांना करोना संसर्गाचे निदान झाले. राज्याच्या साथरोग सर्वेक्षण विभागाने याबाबत माहिती दिली. मात्र, बहुसंख्य करोना रुग्णांना सौम्य लक्षणे असून ते घरच्या घरी बरे होत असल्याने घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

गुरुवारी दिवसभरात आढळलेल्या १३३ नवीन रुग्णांपैकी ६१ रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रातील आहेत. ५७ रुग्ण पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात, तर १५ रुग्ण जिल्ह्याच्या उर्वरित भागात आढळले आहेत. संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी विशेषत: जोखीम गटातील रुग्ण, सहव्याधीग्रस्त आणि ज्येष्ठ नागरिकांनी तसेच लसीकरण न झालेल्या नागरिकांनी मुखपट्टी वापरासह सर्व आवश्यक खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. गुरुवारी आढळलेल्या १३३ नव्या रुग्णांमुळे पुणे जिल्ह्यातील एकूण करोना रुग्णसंख्या १४ लाख ९६ हजार ५५१ एवढी झाली आहे. जिल्ह्यातील १७७५ रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

> **राज्याच्या साथरोग सर्वेक्षण विभागाने याबाबत माहिती दिली. मात्र, बहुसंख्य करोना रुग्णांना सौम्य लक्षणे असून ते घरच्या घरी बरे होत असल्याने घाबरून जाण्याचे कारण नसल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**

# काँग्रेसने दूर लोटलेल्या कलमाडींच्या कार्यक्रमाला भाजप नेत्यांची मांदियाळी!

## येत्या 6 सप्टेंबरला होणाऱ्या मिस पुणे स्पर्धेला अमृता फडणवीस उपस्थित राहणार

**पुणे ।**
**।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

काँग्रेस पक्षाचे माजी खासदार सुरेश कलमाडी यांच्या 'पुणे फेस्टिव्हल'चे उद्घाटन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते बहुतांश भाजप नेत्यांच्या उपस्थितीत होणार आहे. त्यामुळे कलमाडी यांची भाजपशी जवळीक वाढल्याची चर्चा पुण्यात रंगली आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनात भ्रष्टाचाराच्या आरोपानंतर काँग्रेसने कलमाडी यांना पक्षातून निलंबित केले होते. तेव्हापासून ते काँग्रेसपासून चार हात दूरच राहिले होते. आता मात्र कलमाडी आयोजक असलेल्या पुणे फेस्टिव्हलचे उद्घाटन भाजप नेत्यांच्या गर्दीत होणार आहे. विशेष म्हणजे येत्या ६ सप्टेंबरला होणाऱ्या मिस पुणे स्पर्धेला अमृता फडणवीस उपस्थित राहणार आहेत.



पुणे फेस्टिव्हलचं उद्घाटन शुक्रवारी (२ सप्टेंबर) सायंकाळी होणार आहे. या वर्षी उद्घाटक म्हणून भाजपचे नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी येणार आहेत. सोबतच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आणि कोथरुडचे आमदार चंद्रकांत पाटील, मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्यासह स्थानिक भाजप नेत्यांची उपस्थिती असणार आहे. याशिवाय चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारही या कार्यक्रमास हजेरी लावणार आहेत. मात्र, पुणे फेस्टिव्हलचा इतिहास पाहता बहुतांश वेळा उद्घाटन हे काँग्रेस नेत्यांच्या हस्तेच झालेले आहे.

यंदा मात्र भाजप नेत्यांच्या उपस्थितीने राजकीय वर्तुळाच्या भूवया उंचावल्या आहेत.

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या आयोजनात भ्रष्टाचार केल्याचा आरोप सुरेश कलमाडी यांच्यावर झाला होता. त्यानंतर काँग्रेसने त्यांना पक्षातून निलंबित केले होते. तेव्हापासून कलमाडी हे काँग्रेसपासून दूर होते. काही दिवसांपूर्वी त्यांनी पुणे महापालिकेत हजेरी लावली होती.

त्यावेळी त्यांच्याकडून राजकारणात पुन्हा सक्रीय होण्याचे संकेत मिळाले होते. आता भाजप नेत्यांना उद्घानला बोलावून कलमाडी यांनी आपली दुसरी इनिंग तर सुरू केली नाही, अशी चर्चा पुण्यात रंगली आहे. ते राजकारणापासून दूर असले तरी त्यांना मानणारे कार्यकर्ते अजूनही पुण्यात आहेत, त्यामुळे भाजपच्या पाठिंब्याने ते आपली सेकंड इनिंग सुरू करतात का, हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

### कलमाडींना भाजपत सामावून घेणार का?


भाजपने ज्यांच्यावर भ्रष्टाचार आरोप केले, अशा लोकांनाच पक्षात घेऊन पावन केले आहे. यामध्ये विजयकुमार गावीत, बबनराव पाचपुते, कृपाशंकर सिंह यांच्यासह इझनावर नेत्यांवर भाजपकडून सुरुवातील आरोप करण्यात आले, त्यानंतर त्याच लोकांना भाजपमध्ये प्रवेश दिलेला आहे. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील भ्रष्टाचाराचे प्रकरण अद्याप न्यायालयात प्रलंबित आहे, त्यामुळे कलमाडींना भाजपत सामावून घेणार का, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे.

# ढोल-ताशांच्या गजरात उद्योगनगरीत बाप्पांचे आगमन!

## गणेशक्तांच्या अभूतपूर्व उत्साहाने उद्योगनगरी गणेशमय, पाऊस पडल्याने गणेशभक्त सुखावले

**पिंपरी। ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**गणपती बाप्पा मोरया.. मंगल मूर्ती मोरया.. चा जयघोष आणि ढोल-ताशांच्या गजरात लाडक्या गणरायाचे बुधवारी उद्योगनगरीत आगमन झाले. ठिकठिकाणी मिरवणुकीद्वारे गणरायाला मोठ्या उत्साहात घरी आणण्यात आले. घरगुती गणपतींची सकाळी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी दुपारनंतर गणरायाची प्रतिष्ठापना केली.**





वरुणाचा अभिषेक, गणेशक्तांच्या अभूतपूर्व उत्साहाने उद्योगनगरी गणेशमय झाली आहे. पाऊस पडल्याने गणेशभक्त सुखावले आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गेली दोन वर्षे गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यात आला होता. यावर्षी कोरोनाचे संकट कमी झाल्याने, निर्बंध उठल्याने पिंपरी-चिंचवड उद्योगनगरीत मोठा उत्साह दिसून आला.

घरगुती गणपतीची स्थापना सकाळपासूनच सुरू होती. तर सार्वजनिक उत्सव गणेशोत्सव मंडळाना पुढील दहा दिवसांसाठी मोठा उत्साह संचारला असल्याचे दिसून आले.

### ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची मिरवणूक कोरोना निर्बंध हटल्यानंतर उत्साहाने गणेशोत्सव साजरा होत असल्याचे दिसून येत आहे. दुपारपर्यंत पावसाने उघडीप दिली. त्यामुळे गणरायाची मूर्ती घरी आणणे, सजावटीचे साहित्य खरेदीसाठी बाजारपेठेतही गणेश भक्तांची लगबग दिसून आली. पहिल्या टप्प्यात गणेशभक्तांनी घरगुती प्रतिष्ठापना केली. बाप्पाची सजावट करण्यासाठी कुटुंबातील नागरिकांची धावपळ सुरु असल्याचे दिसून आले. दुपारनंतर सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानी मिरवणूक काढून बाप्पांची प्रतिष्ठापना केली.

### माजी विरोधी पक्षनेते विनोद नढे यांना मातृशोक



**पिंपरी ।** पिंपरी चिंचवड महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते, नगरसेवक विनोद नढे यांच्या मातोश्री सौ. रंजना जयवंत नढे यांचे आज (१ सप्टेंबर) रोजी पहाटे दुखद निधन झाले. त्या ५९ वर्षाच्या होत्या. काळेवाडी येथील स्मशानभूमीत सकाळी ११.३० वाजता अंत्यविधी करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले आणि दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. रंजना नढे या गेल्या काही दिवसांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर उपचार सुरु होते. परंतु आज पहाटे त्यांनी शेवटचा श्वास घेत जगाचा निरोप घेतला. त्यांच्या जाण्याने नढे कुटुंब व काळेवाडी परिसरात शोककळा पसरली आहे. रंजना नढे यांनी राजकारण, समाजकारण, संप्रदाय आणि व्यावसायिक क्षेत्रात दोन्ही मुलांना योग्य ते संस्कार दिले. काळेवाडी सह पंचक्रोशीत आदर्श माता म्हणून परिचित होत्या. त्यांच्या जाण्याने नढे कुटुंबियांवर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## शहरातील गणेश मंडळांनी राज्य सरकारच्या सर्वोत्कृष्ट गणेश मंडळाच्या स्पर्धेत सहभागी व्हावे!

### पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांचे आवाहन

**पिंपरी। । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

महाराष्ट्र राज्यातील उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना शासनाच्यावतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यासाठी पिंपरी-चिंचवड शहरातील जास्तीत-जास्त गणेस मंडळांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी केले.यासाठी मंडळांना शुक्रवार (दि.२) पर्यंत अर्ज करता येणार आहेत. यासाठी जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील सर्वोत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांमधून ३ विजेते राज्यस्तरीय समितीकडून घोषित करण्यात येणार आहेत. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यांना ५ लाख



रुपये, द्वितीय क्रमांकाच्या विजेत्यास अडीच लाख रुपये आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास १ लाख रुपये रकमेचे पारितोषिक व प्रमाणपत्र तसेच उर्वरित ३३ गणेशोत्सव मंडळास २५ हजार रुपये पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन शासनाकडून गौरव होणार आहे. त्यासाठी गणेशोत्सव मंडळांनी अर्ज भरुन MAHOTSAV.PLDA@GMAIL.COM या ईमेलवर ऑनलाईन पाठवावेत. गणेश मंडळांना अर्जाचा नमुना राज्य शासनाच्या WWW.MAHARASHTRA.GOV.IN या संकेतस्थळावर तसेच पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या WWW.PLDESHPANDEKALAACADEMY.ORG या संकेतस्थळावर किंवा दर्शनिका विभागाच्या HTTPS://MAHAGAZETTEERS.COM या संकेतस्थळावरही उपलब्ध आहे. हा अर्ज आणि सहभागासाठी कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही. निवड समिती गणेशोत्सव उत्सवस्थळी प्रत्यक्ष भेट देतील. व्हिडीओ व आवश्यक कागदपत्र गणेशोत्सव मंडळाकडून प्राप्त करुन घेतील. ही समिती प्रत्येक गणेशोत्सव मंडळाबाबत गुणांकन करुन त्यातील एका उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळाची शिफारस करून त्यांच्या संबंधित कागदपत्रांसह व्हिडीओ व गुणांकन राज्य समितीकडे सादर करणार आहेत. तसेच राज्य समितीकडे ३६ जिल्ह्यातील १ याप्रमाणे ३६ प्राप्त शिफारशीत ३ विजेते गणेशोत्सव मंडळ वगळून उर्वरित ३३ गणेशोत्सव मंडळांनाही राज्य शासनाच्या वतीने २५ हजार रुपये पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. सर्व विजेत्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचा बक्षीस वितरणाचा समारंभाचा दिनांक व ठिकाण याबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र शासनाच्या WWW.MAHARASHTRA.GOV.IN या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### स्पर्धेच्या अटी

या स्पर्धेत धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी केलेल्या किंवा स्थानिक पोलीस स्टेशन यांची तसेच स्थानिक स्वराज्य संस्था यांची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येणार आहे. सहभागी झालेल्या मंडळांना शासननिर्णयानुसार ठरवलेल्या बाबींची पूर्तता केल्यास एकूण १५० गुणांपैकी गुण दिले जातील.यामध्ये पर्यावरणपुरक मूर्ती, पर्यावरणपुरक सजावट, ध्वनीप्रदुषण रहित वातावरण, पाणी वाचवा, मुलगी वाचवा, अंधश्रद्धा निर्मूलन, सामाजिक सलोखा अशा प्रकाच्या समाज प्रबोधन विषयावर किंवा स्वांतत्र्याच्या चळवळीसंदर्भातील देखावा आणि सजावट, रक्तदान शिबीर, वैद्यकीय सेवा शिबिर इत्यादी कार्य, महिला, ग्रामीण भागातील वंचित घटक शाळकरी तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक, आरोग्य, ८सामाजिक क्षेत्रात केलेले कार्य, पारंपारिक सांस्कृतिक कार्यक्रम किंवा स्पर्धा, गणेश भक्तांसाठी देत असलेल्या प्राथमिक सुविधांमध्ये पाणी, प्रसाधनगृहे, वैद्यकीय प्रथमोपचार, परिसरातील स्वच्छता, वाहतुकीस अडथळा येणार नाही असे नियोजन, आयोजनातील शिस्त आदी बाबींचा समावेश आहे.

## संपादकीय »

### वरुणराजाचा सांगावा...

***परतीचा पाऊस सुरू होण्याआधीच राज्यातील धरणे तुडुंब भरली ही बातमी तशी आनंद देणारीच.***

देशातील अठरा राज्यांत यंदा तुलनेने पाऊस कमी झालेला असताना विंध्य पर्वताच्या खालचा भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र व दक्षिणेकडील काही राज्यांत झालेला दमदार पाऊस अविश्वसनीय म्हणावा असाच. त्यातल्या त्यात पावसाचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या केरळमधील पावसाची 'उणे' सरासरी लक्षात घेता या भागातील जलसाठ्यात झालेली वाढ समाधान देणारी. आता प्रश्न निर्माण होतो तो पुढील नियोजनाचा. या जलसाठ्याचा वापर आपण कसा करणार? पिण्यासाठी व औद्योगिक वापरासाठी लागणारे पाणी सोडून उर्वरित साठ्याचा वापर नेमका कुठे व कसा केला जाणार? शेतीसाठी त्यातले किती पाणी वापरले जाणार? त्यासंबंधीचे सरकारी पातळीवरचे नेमके नियोजन काय? हा साठा गृहीत धरून राज्याच्या कृषी व जलसंपदा खात्याने एकत्र येऊन कृषी विकासाचा काही कार्यक्रम हाती घेतला आहे का? यासारख्या प्रश्नांचा वेध घेतला तर हाती फारसे काही लागत नाही. ही आपल्या राज्याची अवस्था.

वातावरण बदलाचा पावसावर झालेला परिणाम, त्याच्या येण्यात आलेली अनियमितता, त्यातून निर्माण होणारी नैसर्गिक संकटे, कुठे ओला तर कुठे कोरडा दुष्काळ, त्यामुळे निर्माण झालेले असंख्य नवे प्रश्न यावरून सारे जग चिंतित असताना यंदा वरुणराजाने केलेली कृपा नियोजनशून्यतेमुळे वाया घालवली जाणार नाही, याची काळजी घेणे हीच सध्याची गरज. राज्यात यंदा उपलब्ध असलेला जलसाठा गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत सुमारे २० टक्क्यांनी अधिक आहे. त्यामुळे ऑक्टोबर ते मे या आठ महिन्यांच्या काळासाठी आखले जाणारे पाण्याचे नियोजनसुद्धा त्याच पद्धतीने व्हायला हवे. त्या संदर्भात सरकारी पातळीवर अजून तरी फारशी हालचाल दिसत नाही. पाणी भरपूर उपलब्ध असले की सिंचनावर आधारलेल्या रब्बी हंगामाचे पेरणी क्षेत्र वाढायला हवे. या क्षेत्रात काम करणारे सारेच जाणकार यावर भर देतात. या पार्श्वभूमीवर राज्याची आकडेवारी बघितली तर निराशाच पदरी पडते. राज्याचे खरिपाचे क्षेत्र आहे १४९ लाख हेक्टर तर रब्बीचे अवघे ५४ लाख. या दोन्ही क्षेत्रांत दरवर्षी किंचित वाढ नोंदवली जात असली तरी दोहोंमधला फरक लक्षात घेण्याजोगा. रब्बीसाठी सिंचन व्यवस्था लागते व गेल्या अनेक वर्षांपासून राज्याचे सिंचनाचे गाडे १८ टक्क्यांवरच अडकलेले आहे हे खरे असले तरी निसर्गाने दिलेल्या संधीचा उपयोग करून घ्यायला आपण कधीपासून सुरुवात करणार?



## आनंदी सकाळ

### मी हा न्यूनगंड मैत्री करते दूर

मैत्री म्हणजे स्नेहभाव, सख्यभाव होय. हा भाव अबाधित व संशयरहित असण्याचे महत्त्व घडलेल्या प्रसंगातून पाहू. दोन मित्र असतात. एक व्यक्ती एका मित्राच्या कानात 'काही नाही' असे सांगते. दुसऱ्या मित्राने विचारले, 'काय सांगितले?' पहिला म्हणतो, 'काही नाही.' खरे सांगूनही दुसऱ्याच्या मनातील 'हा खोटे बोलत आहे,' अशा संशयामुळेच त्यांच्या मैत्रीत दुरावा येतो. प्रेमभाव कायम राहण्यासाठी वादविवाद टाळणे, आर्थिक व्यवहार न करणे आणि संशयास्पद कानगोष्टी न करणे, ही त्रिसूत्री लक्षात ठेवणे आवश्यक आहे. समान आवड असलेल्यांमध्ये मैत्री जुळते, जशी हरिणाची हरिणांशी, गाईची गाईंबरोबर, बुद्धिमंतांची बुद्धिमंतांबरोबर. म्हणूनच, 'सज्जनमैत्री साधावी' असे शास्त्रकार सांगतात. हे उदाहरणांनी समजावून घेऊ. समुद्र परिपूर्ण आहे. चंद्र त्याचा मित्र असून, पौर्णिमेच्या चंद्रामुळे समुद्राला भरती येते. ऊसाच्या रसाची गोडी शेंड्यातून प्रत्येक पेऱ्यात क्रमाने वाढत जाते, म्हणून स्नेहशील स्वभाव असलेल्या सज्जनांची मैत्री अधिकाधिक वाढत जाऊन, आनंद मिळतो.

## शेतकरी राजासाठीच्या भावना पोहोचल्या... कृतीचे काय?



### भूमिका




“राज्याच्या हितासाठी सैनिक जेवढा महत्त्वाचा आहे, तेवढेच शेतकरी. या दोघांच्याही अडचणी सोडवताना दुजाभाव करायचा नाही असे महाराजांचे धोरण होते. तेव्हा दुष्काळ खूप पडायचा. त्यामुळे उपासमारीची पाळी येऊन शेतकऱ्यांवर मरण ओढवू नये यासाठी धान्याची कोठारे भरलेली असावीत याकडे महाराजांचा कटाक्ष असे. अचूक आणेवारीची पद्धत अमलात आणणारे महाराज देशातले पहिले राजे होते. शेतीचे नुकसान झाले तर संबंधित शेतकऱ्याला त्वरित भरपाई मिळायलाच हवी असे त्यांचे सक्त आदेश होते. राजवटीतील कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांना त्रास दिलेला त्यांना अजिबात खपायचे नाही. शेतकऱ्यांना हक्काची बाजारपेठ मिळायलाच हवी याकडे ते सतत लक्ष देऊन असायचे. शेतसारा गोळा करणारे वतनदार शेतकऱ्यांची पिळवणूक करतात हे लक्षात आल्यावर त्यांनी वतनदारी पद्धतीत अनेक बदल केले. 'शेतकरी सुखी तर राज्य सुखी' अशी त्यांची धारणा होती” ही वैशिष्ट्ये आहेत शिवाजी महाराजांच्या राजवटीची.ती आठवण्याचे कारण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ताज्या कृतीत दडलेले. राज्याचा कारभार हाकताना ऊठसूट महाराजांचे नाव घेण्याची परंपराच अलीकडे रूढ झालेली. त्यालाच पुढे नेत शिंदेंनी राज्यातील तमाम शेतकऱ्यांना लिहिलेले भावनिक पत्र नुकतेच विधिमंडळात वाचून दाखवले. अतिवृष्टी, नापिकी, कर्जबाजारीपणा, शेतमालाला भाव आदी मुद्द्यांवरून गेली काही दशके अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांनी आत्महत्या करू नये अशी साद या पत्रात घातलेली. 'महाराजांची शपथ, आत्महत्या करू नका' हे त्यातले एक महत्त्वाचे वाक्य. शिंदेंनी थेट शेतकऱ्यांना संबोधण्यात काही गैर नाही. तो त्यांचा अधिकार आहेच. मात्र शेतकऱ्यांना असे भावनिक आवाहन करताना शिंदे ज्या सरकारचे प्रमुख आहेत ते शेतकऱ्यांच्या संदर्भात नेमके काय करते? सरकारच्या पातळीवर होत असलेल्या शेतकऱ्यांच्या कोंडीचे काय? सरकारची धोरणे खरोखर शेतकरीहिताची आहेत काय? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

शिंदे ज्या शिवाजी महाराजांचे नाव घेतात त्यांची राजवट सोळाव्या शतकातली. त्यालाही आता ५०० वर्षे होत आलेली. या काळात प्रगती झाली हा सरकारचाच दावा मान्य केला तर ती समाजातील सर्व घटकांसोबत शेतकऱ्यांचीही व्हायला हवी होती, ती का झाली नाही? शेतकरी दिवसेंदिवस संकटात का सापडत गेला यावर आत्मपरीक्षण करण्याऐवजी शिंदे शपथा कशाच्या देत आहेत? महाराजांची शपथ घेतली म्हणजे शेतकऱ्यांच्या सर्व अडचणी दूर होतील व तो आत्महत्येपासून परावृत्त होईल असे शिंदेंना वाटते काय? वास्तवात हे शक्य नाही हे ठाऊक असूनही ते महाराजांचे नाव घेत असतील तर हे फुकाचे राजकारण ते कशासाठी करीत आहेत?

## सुगीचे दिवस झाले सुरू...

गणपती ही विद्येची देवता! गेली दोन वर्षे करोनामुळे या विद्येच्या देवतेचा सोहळा झाला नाही.

गेल्या दोन वर्षांतील करोनाच्या संकटकाळात राज्यभर पसरलेल्या सार्वजनिक गणेश मंडळांच्या अनेक कार्यकर्त्यांनी लाखोंना मदतीचा हात दिला. कुणाच्या घरी जेवणाचे डबे पोहोचवले, तर कुणाला रुग्णालयात दाखल होण्यासाठी मदत केली. एवढेच काय करोनामृतांच्या अंत्यसंस्कारांसाठीही पुढाकार घेतला. पण इतका प्रदीर्घ काळ सार्वजनिक पातळीवरून ज्ञानदेवता गायब झाल्याने या देवतेच्या सार्वजनिक विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचे जरा वांधेच झाले असणार. दोन वर्षे शाळेपासून दूर राहावे लागलेल्या, घरात बसून आंबलेल्या विद्यार्थ्यांचे जे झाले तेच दोन वर्षे या विद्यादेवतेच्या मंडपापासून दूर राहावे लागलेल्यांचे झाले असणार! असा वहीम घेण्यास जागा आहे कारण दोन वर्षांनंतर यंदा दणक्यात होणाऱ्या सार्वजनिक उत्सवातल्या काहींचे वर्तन. दोन वर्षांच्या ज्ञानसंस्कारांची उणीव त्यांच्या वागण्यातून ओसंडून वाहताना आताच दिसू लागली आहे. आणि अद्याप या उत्सवाला सुरुवातही झालेली नाही. गणेशचतुर्थीच्या



मुहूर्तावर ती होईल. त्यानंतर दहा दिवस ज्ञानदेवतेच्या या भक्तगणांचा उत्साह ओसंडून रस्ते/ नद्या/ नाले दुथडी भरून वाहू लागतील. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते परस्परविरोधी कसे असू शकते याचा अभ्यास या काळात समाजशास्त्रींना करता येईल. म्हणजे शिक्षक प्रकांडपंडित आहेत म्हणून त्यांचे विद्यार्थी ढ निपजतच नाहीत असे नाही. त्यामुळे विद्यादेवतेच्या सार्वजनिक प्रदर्शनातील सहभागी अतिउत्साहींच्या अविद्येचे दर्शन घडणारच नाही असे नाही.

आपल्याकडे उत्सवांच्या उत्साही लाटा उचंबळू लागल्या की जनसामान्यांना जीव मुठीत धरून जगावे लागते. आधीच सार्वजनिक शिस्त म्हणजे काय, हा प्रश्न पडावा अशी स्थिती. त्यात या काळात मोडके रस्ते तोडून उभारले गेलेले मंडप, त्यामुळे वळवल्या गेलेल्या वाहतुकीने होणारे वांधे, माणसास बहिरे होण्यासाठी ध्वनिलहरी किती तीव्र लागतात हे मापनासाठी चौकोचौकी सुरू होणारे प्रयोग इत्यादी सारे अनुभवास येऊन वातावरणातील आनंदमयता आणि भक्तिभाव अधिकच वाढीस लागलेला पाहता येईल. त्यात यंदा या साऱ्यासाठी आणखी एक विशेष आहे. ते म्हणजे आगामी महापालिका निवडणुका. आधीच साग्रसंगीत सार्वजनिक गणेशोत्सव आणि त्यात येऊ घातलेल्या निवडणुका! अनेक मंडळांनी गेल्या काही वर्षांत रुग्णवाहिकांची सोय, प्राथमिक उपचार केंद्रे, कायदेशीर सल्ला, शाळांना, रुग्णालयांना मदत अशी अनेक समाजोपयोगी कामे केली. त्यासाठीही संभाव्य आणि विद्यमान लोकप्रतिनिधी सढळ हस्ते मदत करतील. त्यामुळे यंदाच्या गणेशोत्सवात दिसणारा हुरूप धडकी बसवेल यात शंका नाही. सार्वजनिक गणेश मंडळाच्या माध्यमातून निवडणुकीआधीच जनसंपर्क अभियान राबवून मतांची बेगमी करण्याची ही नामी संधी.

## ।। अभंगवाणी ।।



करावी ते पूजा मनें चि उत्तम ।
लौकिकाचें काम काय असे ॥१॥
कळावें तयासि कळे अंतरींचें ।
कारण तें साचें साचा अंगीं ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी गाळा क्रमांक 79-80 छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, संत तुकाराम नगर, अग्निशमन केंद्रासमोर, पिंपरी, पुणे - 411018. **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# तासगावचा ऐतिहासिक रथोत्सव उत्साहात

**सांगली । महाईन्यूज ।**

निर्बंधमुक्त वातावरणामध्ये तासगावचा २४३ वा रथोत्सव गुरूवारी मोठ्या उत्साहात साजरा झाला. मंगलमूर्ती मोरया, गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात श्रींची पंचधातूची मुर्ती असलेला रथ एक किलो मीटर अंतरावरील काशीविश्‍वेश्‍वराच्या दर्शनाला निघाला त्यावेळी गणेश भक्तांनी गुलाल, पेढ्यांची उधळण केली. यावेळी रथाचे सारथ्य मराठ्यांचे अखेरचे सेनापती परशुरामभाउ पटवर्धन यांचे वंशज राजेंद्र पटवर्धन यांनी केले.

या रथोत्सवास दारूबंदी व उत्पादन शुल्क मंत्री शंभूराजे देसाई, खा. संजयकाका पाटील, राष्ट्रवादीचे युवक नेते रोहित पाटील आदींसह राजकीय सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. रथोत्सवादिवशीच गणपती पंचायतन संस्थानच्या ऐतिहासीक दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन होते. 'मंगलमूर्ती मोरया, गणपती बाप्पा मोरया' च्या जयघोषात, अलौकीक व नयनरम्य सोहळ्यात हा रथोत्सव पार पडला. 'मंगलमुर्ती मोरया' च्या जयघोषात भाविक गणरायाचा रथ दोरखंडाच्या सहाय्याने ओढतात. गणपती मंदिर ते समोर अर्धा किलोमिटरवर असलेल्या काशिविश्‍वेश्‍वर मंदीरापर्यंत हा रथ ओढत नेला जातो. रथ ओढण्यास सुरवात झाल्यानंतर गुलाल व पेढ्यांची झालेली उधळण, युवकांनी रथासमोर केलेले मानवी मनोरे, झांज पथक, समोर दिमाखात चालणारी गौरी' हत्तीण यामुळे संपूर्ण वातावरण मंगलमय झाले होते. करोनामुळे तब्बल दोन वर्षांचा खंड पडल्यानंतर यंदा तासगावात गणेशोत्सवाचा आणि रथोत्सव सोहळ्यात मोठा उत्साह दिसून आला.

> रथोत्सवादिवशीच गणपती पंचायतन संस्थानच्या ऐतिहासीक दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन होते. 'मंगलमूर्ती मोरया, गणपती बाप्पा मोरया' च्या जयघोषात, अलौकीक व नयनरम्य सोहळ्यात हा रथोत्सव पार पडला. 'मंगलमुर्ती मोरया' च्या जयघोषात भाविक गणरायाचा रथ दोरखंडाच्या सहाय्याने ओढतात. गणपती मंदिर ते समोर अर्धा किलोमिटरवर असलेल्या काशिविश्‍वेश्‍वर मंदीरापर्यंत हा रथ ओढत नेला जातो. रथ ओढण्यास सुरवात झाल्यानंतर गुलाल व पेढ्यांची झालेली उधळण, युवकांनी रथासमोर केलेले मानवी मनोरे, झांज पथक, समोर दिमाखात चालणारी गौरी' हत्तीण यामुळे संपूर्ण वातावरण मंगलमय झाले होते.



## राज्यात सिकलसेलच्या रुग्णांमध्ये वाढ

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

करोना काळात आरोग्य विभागाकडून सिकलसेल या अनुवंशिक आजाराच्या रुग्णांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष झाले आहे. आरोग्य विभाग करोना रुग्णांवरील उपचारात गुंतल्यामुळे सिकलसेल रुग्णांची तपासणी मोहीम ज्या प्रमाणात करणे अपेक्षित होते ती करता आलेली नाही. मात्र, गेल्या दोन वर्षात ज्या काही चाचण्या आरोग्य विभागाने केल्या त्याचा विचार करता राज्यात सिकलसेसच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. आगामी वर्षात ज्या जिल्ह्यांमध्ये या आजाराचे रुग्ण प्रामुख्याने आढळून येतात त्या जिल्ह्यात व्यापक शोधमोहीम राबिवण्याचा

# देवेंद्र फडणवीस, बावनकुळेंनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राज ठाकरेंच्या भेटीला!

## राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण!

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

एकनाथ शिंदे आणि राज ठाकरेंमध्ये 'शिवतीर्थ'वर भेट!

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर आता दोन महिने उलटले आहेत. राज्यात हे सरकार स्थिरावू लागलेलं असतानाच दुसरीकडे मुंबईसोबत राज्यातील काही महत्त्वाच्या महानगर पालिकांच्या



निवडणुकादेखील येऊ घातल्या आहेत. अवघ्या काही महिन्यांत या निवडणुका होण्याची शक्यता असताना राजकीय पक्षांनी त्यादृष्टीने हालचाली करायला सुरुवात केली आहे.

### पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भेट?

राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आल्यापासून राज ठाकरेंनी या सरकारच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली होती. तसेच, भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अनेक भूमिकांचं त्यांनी समर्थन देखील केलं होतं. या पार्श्वभूमीवर मनसे आणि भाजपा युतीची चर्चा गेल्या दोन-अडीच वर्षांपासून सुरू आहेत. त्यात नुकताच राज्यात सत्ताबदल झाल्यानंतर या चर्चेला अधिकच ऊत आला आहे. आगामी महानगर पालिका निवडणुकांसाठी राज ठाकरे भाजपासोबत युती करण्याची शक्यता वर्तवली जाऊ लागली. या पार्श्वभूमीवर भाजपाच्या अनेक वरिष्ठ नेत्यांपाठोपाठ आता एकनाथ शिंदेंनीही राज ठाकरेंची भेट घेतल्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दोनच दिवसांपूर्वी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज ठाकरेंची त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतली होती. यावेळी "मी कौटुंबिक कारणांसाठी ही भेट घेतली होती. त्यातून राजकीय अर्थ काढू नये. मात्र, युतीबाबतचा निर्णय आमचे दिल्लीतील पक्षश्रेष्ठी, अमित शाह, जे. पी. नड्डा, देवेंद्र फडणवीस हे घेतील", असं बावनकुळे म्हणाले होते.

# स्वत:ची पाठ स्वत:च थोपटून घेण्याचा प्रत्यय 'ईडी' सरकारच्या या वागण्यातून येतो – नाना पटोले

## कर्जाची परतफेड करण्यासाठी सरकार सामान्य नागरिकांकडून वसुली करत आहे

**दुधड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी राज्य सरकारवर महागाईच्या मुद्य्यावरून टीका केली आहे. "जनतेचे सरकार आले आहे असे बॅनर जनता नाही तर, स्वतः भाजपाच लावत आहे ! स्वत:ची पाठ स्वत:च थोपटून घेण्याचा प्रत्यय ईडी सरकारच्या या वागण्यातून येतो." असं पटोलेंनी ट्वीटद्वारे म्हटलं आहे.



याचबरोबर, "सद्यस्थितीतील महागाईचे आकडे पाहता सर्वात महागडं राज्य महाराष्ट्र आहे. भाजपा सरकारने महागाईचा कळस गाठला आहे. सद्यस्थितीतील महागाईचे आकडे पाहता सर्वात महागडं राज्य महाराष्ट्र आहे. फडणवीस सरकारच्या काळात मोठ्याप्रमाणात घेण्यात आलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी हे सरकार सामान्य नागरिकांकडून वसुली करत आहे." असंही म्हणत नाना पटोलेंनी राज्य सरकारवर टीका केली आहे.

मागील महिन्यात महागाई, बेरोजगारी आणि अग्निपथ योजनेच्या विरोधात काँग्रेसने आक्रमक होत नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. मोर्चात काही कार्यकर्ते भेंडी, कारले, कांदे, बटाटे, टोमॅटो, वांगी आदी भाज्यांची माळ घालून तर हातात तेलाचे पिंप घेऊन महागाईच्या मुद्यांकडे सरकारचे लक्ष वेधले.

सिलिंडर, पेट्रोल-डिझेलच्या किंमतीत झालेली भरमसाट वाढ आणि युवकांना नोकरी मिळत नसल्याबद्दल केंद्रातील मोदी सरकारविरोधी घोषणा देत काही कार्यकर्त्यांनी पोलिसांनी लावलेले सुरक्षा कठडे पार करून जिल्हाधिकारी कार्यालायत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे तेथे उपस्थित पोलिसांशी त्यांची झटापट झाली होती.

# "बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी", शहाजी बापू पाटलांवर पेडणेकरांची सडकून टीका

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



राज्यातील सत्तांतर नाट्यादरम्यान "काय झाडी, काय डोंगार, काय हाटिल" या डॉयलॉगमुळे प्रसिद्ध झालेले सांगोला विधानसभा मतदारसंघाचे आमदार शहाजी बापू पाटील सध्या एका नवीन वक्तव्यामुळे चर्चेत आहेत. खूप गरिबीत जगतोय, किती दिवसांपासून बायकोला साडी देखील घेऊ शकलो नाही, या त्यांच्या विधानावर आता राजकीय प्रतिक्रिया उमटताना दिसत आहे. शहाजी पाटलांच्या बायकोला आता लोकांनी साडी घेऊन द्यायची का? असा मिश्किल टोला मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनी लगावला आहे. "बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी" असं म्हणत पेडणेकर यांनी पाटलांच्या वक्तव्याचा समाचार घेतला आहे. लोकांना पटेल एवढंच खोटं बोलावं, असा सल्ला देखील पाटलांना पेडणेकर यांनी दिला आहे. गाणं व्हायरल झाल्यानंतर मिळालेल्या प्रसिद्धीमुळे शहाजी बापू पाटील सातव्या आसमानवर पोहोचले आहोत. त्यांना लवकरच जनता खाली आणेल, असेही पेडणेकर यांनी म्हटलं आहे

## शॉर्ट न्यूज

**धक्कादायक! कामावरून काढून टाकल्याने 7 कर्मचाऱ्यांची विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न**

**।नवी दिल्ली। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

एका खासगी कंपनीत काम करणाऱ्या सात कर्मचाऱ्यांनी विष प्राशन करत आत्महत्येचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना इंधूरमध्ये घडली आहे. गुरुवारी सकाळी कर्मचाऱ्यांनी एकाच वेळी आत्महत्या करण्याच्या उद्देशाने विषारी पदार्थाचे सेवन केल्याची माहिती समोर आली आहे.

संबंधित कंपनीने नुकतेच सातही कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले होते, त्यामुळे त्यांनी हे पाऊल उचलल्याचे सांगितले जात आहे. सध्या सर्व कर्मचाऱ्यांना इंदूरच्या एमवाय हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. जमनाधर विश्वकर्मा, दीपक सिंग, राजेश मेमोरिया, देवीलाल करेडिया, रवी करेडिया, जितेंद्र धामनिया, शेखर वर्मा अशी आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या कर्मचाऱ्यांची नावं आहेत. या घटनेपासून कंपनीचा मालक रवी बाफना आणि पुनीत अजमेरा फरार आहे.

# भ्रष्ट लोकांविरुद्धच्या कारवाईमुळे राष्ट्रीय राजकारणात फूट!

## पीएम मोदींचं मोठं वक्तव्य

**मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

भ्रष्ट लोकांविरुद्धच्या कारवाईमुळे राष्ट्रीय राजकारणात फूट पडल्याचं मोठं वक्तव्य देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नरेंद्र मोदी दोन दिवसीय केरळच्या यात्रेवर आहेत. कोची आंतरराष्ट्रीय विमानतळाबाहेर आपल्या समर्थकांना संबोधित करताना मोदी म्हणाले की, भ्रष्टाचार हा युवकांच्या विकासात आणि हिताचा सर्वात मोठा अडथळा आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

भ्रष्ट व्यक्तींवर कारवाई केल्याने राष्ट्रीय राजकारणात फूट पडल्याचे दिसून आले आहे. यासाठी काही राजकीय गट पुढे आले आहेत. राज्यात डबल इंजिनचं सरकार आहे. तसेच मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास या मंत्राला अनुसरून भाजप सरकार मोठ्या संकल्पात बदल करत आहेत. केंद्र सरकारचे सर्वोच्च प्राधान्य गरीब, दलित, शोषित, वंचित, आदिवासींना



मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आहे. पंतप्रधान मोदींनी संध्याकाळी 6 वाजता कोची मेट्रो, भारतीय रेल्वेच्या 4,500 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध प्रकल्पांची पायाभरणी केली आहे आणि ते राष्ट्राला समर्पित केले आहे.

काही दिवसांपूर्वीच देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे पूर्ण झाली आहेत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजे देशाला विकसित राष्ट्र बनवण्याच्या संकल्पावर काम करण्याची वेळ आहे. यात केरळच्या कष्टकरी लोकांचा मोठा वाटा आहे.

पंतप्रधान म्हणाले की, भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्रातील एनडीए सरकार केरळमधील लोकांच्या गरजा आणि आकांक्षांबाबत अत्यंत संवेदनशील आहे. आमचे सरकार देशातील प्रत्येक गरीबाला पक्के घर देण्याची मोहीम राबवत आहे. पीएम आवास योजनेंतर्गत केरळमधील गरिबांसाठी सुमारे दोन लाख पक्की घरे मंजूर करण्यात आली आहेत.

**देशाला स्वातंत्र्य मिळून 75 वर्षे पूर्ण झाली आहेत. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव म्हणजे देशाला विकसित राष्ट्र बनवण्याच्या संकल्पावर काम करण्याची वेळ आहे. यात केरळच्या कष्टकरी लोकांचा मोठा वाटा आहे.**

**पंतप्रधान म्हणाले की, भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्रातील एनडीए सरकार केरळमधील लोकांच्या गरजा आणि आकांक्षांबाबत अत्यंत संवेदनशील आहे. आमचे सरकार देशातील प्रत्येक गरीबाला पक्के घर देण्याची मोहीम राबवत आहे. पीएम आवास योजनेंतर्गत केरळमधील गरिबांसाठी सुमारे दोन लाख पक्की घरे मंजूर करण्यात आली आहेत.**

# काँग्रेसमध्ये धुसफूस सुरुच

## पक्षश्रेष्ठींची पृथ्वीराज चव्हाणांवर कारवाईची मागणी

**जयपूर ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

काँग्रेस पक्षातील अंतर्गत वाद काही थांबण्याचे नाव घेत नाहीत. केंद्रीय मंत्री गुलाम नबी आझाद यांनी पक्ष सोडल्यानंतर काँग्रेसमधील अंतर्गत लढाई अधिक चिघळतेय. अशात इंडियन ओव्हरसीज काँग्रेसचे सचिव वीरेंद्र वशिष्ठ यांनी पक्षाचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. ग्रुप 23 चे सदस्य असलेले पृथ्वीराज चव्हाण यांनी अलीकडेच काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात आवाज उठवला होता, याच वक्तव्याप्रकरणी चव्हाण यांच्यावर कारवाईची मागणी केली जात आहे.

काँग्रेसच्या शिस्तपालन समितीचे अध्यक्ष तारिक अन्वर यांनी पाठवलेल्या मेलमध्ये वीरेंद्र वशिष्ठ यांनी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यावर कारवाईची मागणी केली आहे. वशिष्ठ यांनी आपल्या पत्रात म्हटले



आहे की, 'काँग्रेस पक्षाच्या अंतर्गत निवडणुकांबाबत पृथ्वीराज चव्हाण यांच्या गेल्या काही दिवसांपासून टीव्ही चॅनेल्सवर सुरू असलेल्या खोट्या वक्तव्याकडे मी तुमचे लक्ष वेधून घेऊ इच्छितो. राहुल गांधी यांच्याविरोधात खोटे बोलल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्याचीही माझी मागणी आहे. विशेष म्हणजे चव्हाण यांनी 30 ऑगस्ट रोजी गुलाम नबी आझाद यांची भेट घेतली होती. चव्हाण यांच्यासोबत हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भूपेंद्र हुड्डा आणि आनंद शर्मा यांच्यासह G-23 सदस्य होते. बैठकीच्या काही दिवस आधी आझाद यांनी राहुल गांधींना 'अपरिपक्व' म्हणत पक्षाचा राजीनामा दिला होता. सल्लागार यंत्रणा मोडीत काढल्याबद्दल त्यांनी राहुल गांधींना दोष दिला.

# येत्या काही वर्षांत पाकिस्तानातील परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता

**।वर्धा । महाईन्यूज । विशेष प्रतिनिधी ।**

येत्या काही वर्षांत पाकिस्तानातील परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता हवामान खात्याच्या तज्ज्ञांकडून वर्तवली जात आहे. जागतिक तापमान वाढीचे परिणाम आश्चर्यकारक असल्यामुळे देशाला समोर येणाऱ्या पुरपरिस्थितीला तोंड द्यावे लागणार आहे. पाकिस्तानात पूरग्रस्त परिस्थितीमुळे आतापर्यंत 1100 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. तर घरांचेही अधिक नुकसान झाले आहे. ३३ दशलक्ष लोकसंख्या बाधित झाली आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे सरकारने आंतरराष्ट्रीय समुदायाकडे मदतीचे आवाहन केले आहे.

हवामान बदलामुळे प्रभावित झालेल्या देशांच्या यादीत पाकिस्तान आठव्या क्रमांकावर आहे. माजी पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी इस्लामाबादमध्ये परदेशी राजनैतिक अधिकाऱ्यांची



## हवामान तज्ज्ञांचा इशारा

भेट घेतली. पंतप्रधान म्हणाले की, अतिवृष्टीमुळे 33 दशलक्षाहून अधिक लोक उद्ध्वस्त झाले आहेत. पाकिस्तानमध्ये कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण नगण्य आहे, परंतु हवामान बदलामुळे भयानक परिस्थितीचा सामना करणाऱ्या देशांच्या यादीत ते आठव्या क्रमांकावर आहे.

शरीफ म्हणाले की, देशाला झालेल्या आर्थिक नुकसानीचा आढावा घेतला जात आहे, जो अब्जावधींमध्ये आहे.

### पर्यावरणवाद्यांचा इशारा

कराचीतील पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ. सीमा जिलानी यांनी इशारा दिलाय की, हवामान बदलाचे परिणाम धक्कादायक आहेत. पाकिस्तान आणि जगाच्या इतर भागात जे काही घडत आहे ते हवामान बदलाचा परिणाम आहे. डॉ. जिलानी आणि कराची विद्यापीठाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. अमीर आलमगीर यांसारखे इतर तज्ञ सुरक्षा आणि हवामान बदलावर संशोधन करत आहेत.

# नितीश कुमारांना समर्थक सुशासन बाबू म्हणून ओळखतात

## नक्वींनी नितीशकुमारांवर साधला निशाणा



**कर्नाटक। महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

माजी केंद्रीय मंत्री आणि भाजपचे ज्येष्ठ नेते मुख्तार अब्बास नक्वी यांनी गुरुवारी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्यावर निशाणा साधला आहे, विरोधी आघाडीचे तथाकथित संयोजक 'कुशासन बाबू'चा झगा घालून 'सुशान बाबू'ची झोळी घेऊन फिरत आहेत अशा शब्दात नक्वींनी नितीशकुमारांवर निशाणा साधला आहे. तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव (के चंद्रशेखर राव) यांनी बिहार दौऱ्यानंतर राज्यातील अनेक वरिष्ठ नेत्यांची भेट घेतली आणि 'भाजप-मुक्त भारत'ची हाक दिली. त्यानंतरचं नक्वी यांनी ही टीका केली आहे.बिहारचे आपले समकक्ष नितीश कुमार आणि उपमुख्यमंत्री तेजस्वी प्रसाद यादव यांच्यासोबत पत्रकार परिषदेत दिसले. यावेळी त्यांनी लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या हुकूमशाही विरोधात केलेल्या क्रांतीचे स्मरण करताना भाजपचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी विरोधकांनी एकत्र येण्याची गरज व्यक्त केली. येथे पत्रकारांशी बोलताना नक्वी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात आघाडी स्थापन केलेल्या विरोधी पक्षांच्या प्रयत्नांना भ्रष्टाचाराच्या पेटीवर पापाचे टाके घालण्याची उपमा दिली. नक्वी म्हणाले की, जेडीयूचे(जनता दल युनायटेड) नितीश कुमार यांना त्यांचे समर्थक सामान्यतः 'सुशासन बाबू' म्हणून ओळखतात. अमृत काळात मोदींना हटवण्याचे विरोधकांचे स्वप्न म्हणजे क्षमतेपेक्षा जास्त काम करण्याचा प्रयत्न आहे, 'अमृत काळ' हा प्रामाणिक आणि कष्टाळू लोकांचा उत्सव आहे.

### 'अमृत काळ' म्हणजे काय?

**'अमृत काळ' हा शब्द भाजप सरकार अनेकदा वापरतो हे सर्वज्ञात आहे. 1947 साली आपला देश स्वतंत्र झाला आणि या वर्षी आपल्या स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण झाली आहेत. सरकारने आत्ता 2047 या कालावधीला 'अमृत काळ' असे नाव दिले आहे. यादरम्यान देश स्वातंत्र्याला 100 वर्षे पूर्ण झाल्याचा आनंद साजरा करणार आहे.**

# 'माझी तुझी रेशीमगाठ' मालिका लवकरच घेणार प्रेक्षकांचा निरोप

झी मराठी वाहिनीवर 'माझी तुझी रेशीमगाठ' ही मालिका प्रेक्षकांच्या चांगलीच पसंतीस उतरताना पाहायला मिळत आहे. या मालिकेत येणाऱ्या अनेक ट्विस्टमुळे ही मालिका घराघरात लोकप्रिय झाली आहे. या मालिकेत अभिनेता श्रेयस तळपदे, प्रार्थना बेहेरे हे दोघे प्रमुख भूमिकेत पाहायला मिळत आहे. त्यासोबतच परीची भूमिका




साकारणारी बालकलाकार मायरा वायकुळलाही विशेष पसंती मिळत असल्याचे पाहायला मिळत आहे. अभिनेता संकर्षण कऱ्हाडे, प्रदीप वेलणकर या कलाकारांमुळे मालिकेला चार चांद लागले आहेत. मात्र आता लवकरच ही मालिका बंद होणार असल्याचे बोललं जात आहे.

'माझी तुझी रेशीमगाठ' या मालिकेतून सिंगल मदर असलेली नेहा आणि तिची मुलगी परी यांच्या आयुष्यात येणारा श्रीमंत उद्योजक यशवर्धन यांची कथा दाखवण्यात येत आहे. गेल्या काही दिवसांपासून या मालिकेत नेहाचा पहिला पती अविनाश हा परत आला आहे. त्यामुळे नेहाच्या आयुष्यात खूप उलथापालथ सुरु आहे. परीचा ड्रायव्हर हाच नेहाचा पहिला नवरा अविनाश असल्याचं सत्य यशसमोर आल्याने आता या दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला आहे. नेहाने हे सत्य लपवून ठेवल्याचा धक्का यशबरोबरच चौधरी कुटुंबाला बसला आहे.

# आमिरचा नव्हे तर धनुषचा 'हा' चित्रपट परदेशात रचतोय इतिहास, कमाईचे आकडे पाहून व्हाल थक्क

'रांझणा' या हिंदी चित्रपटापासूनच धनुषने याची छाप प्रेक्षकांवर पडायला सुरुवात केली होती. आता तरी धनुष हा फक्त दाक्षिणात्य चित्रपटापुरता मर्यादित राहिलेला नसून तो आता हॉलिवूडमध्येसुद्धा महत्वाच्या भूमिका करू लागला आहे. नुकताच त्याने हॉलिवूडचा 'द ग्रे मॅन' या चित्रपटात महत्वाची भूमिका केली आहे, याबरोबरच ती प्रादेशिक चित्रपटातसुद्धा झळकतो आहे. आमिर खानच्या चित्रपटाला परदेशातही फार वाईट



प्रतिसाद मिळाला आहे पण दाक्षिणात्य सुपरस्टार धनुषने मात्र बाजी मारली आहे.


धनुषचा नुकताच आलेला 'थिरुचित्रम्बलम' हा चित्रपट सध्या जगभरात गाजतो आहे. तामिळनाडूमध्ये बॉक्स ऑफिसवर या चित्रपटाने तब्बल ७५ कोटींची कमाई केली आहे. एवढंच नाही तर या चित्रपटाने जगभरात १०० कोटींचा आकडाही पार केला आहे. याबरोबरच हा चित्रपट धनुषच्या कारकीर्दीतला सर्वात जास्त कमाई करणारा चित्रपट ठरला आहे.

अमेरिकेत तर या चित्रपटाने कहर केला आहे. कमल हासनच्या 'विक्रम' आणि थालापती विजयच्या 'बीस्ट' या दोन्ही चित्रपटांना मागे टाकत धनुषचा 'थिरुचित्रम्बलम' चित्रपट २०२२ चा अमेरिकेत सर्वाधिक कमाई करणारा तिसरा तामीळ चित्रपट ठरला आहे. 'थिरुचित्रम्बलम'मध्ये धनुष एका फूड डिलिव्हरी बॉयची भूमिका साकारत आहे. नित्या मेनन, राशी खन्ना, प्रकाश राजसारखे तगडे कलाकारदेखील या चित्रपटात पाहायला मिळतील. दिग्दर्शक मिथुन जवाहर आणि धनुष यांचा एकत्र काम केलेला हा चौथा चित्रपट आहे. यापुढच्याही काही चित्रपटात मिथुन-धनुष ही जोडी प्रेक्षकांना दिसेल अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# एकेकाळी शाळेच्या फीसाठी नव्हते पैसे, आज कोट्यवधींचा संपत्तीचा मालक आहे प्रसिद्ध अभिनेता

राजकुमार रावला त्याच्या पदार्पणाचा चित्रपट 'लव्ह सेक्स और धोका'साठी फक्त १६ हजार रुपये मिळाले होते.

बॉलिवूडच्या सर्वोत्कृष्ट अभिनेत्यांमध्ये राजकुमार रावचं नाव घेतलं जातं. स्वप्नांच्या नगरीत काहीतरी करून दाखवण्याच्या ध्यासाने मुंबईमध्ये आलेल्या राजकुमारने खडतर संघर्षानंतर या क्षेत्रात स्वतःचं वेगळं स्थान तयार केलं आहे. आपल्या अभिनयाच्या जोरावर



इंडस्ट्रीत वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या राजकुमारचा आज ३८ वा वाढदिवस आहे. या निमित्ताने जाणून घेऊयात त्याची एकूण संपत्ती आणि इतर गोष्टींबाबत... ३१ ऑगस्ट रोजी गुडगाव (सध्याचं गुरुग्राम), हरियाणा येथे जन्मलेल्या राजकुमार रावचे खरे नाव राजकुमार यादव आहे. एक काळ असा होता की राजकुमारच्या कुटुंबाकडे शाळेची फी भरण्यासाठीही पैसे नव्हते. त्यावेळी त्याच्या शिक्षकांनी दोन वर्षे त्याचा खर्च उचलला.

# तू तेव्हा तशी’ मालिकेत नवा ट्विस्ट, ‘सिंघम’ फेम अभिनेता साकारणार अनामिकाच्या पहिल्या नवऱ्याची भूमिका

'तू तेव्हा तशी' मालिकेमध्ये एका नव्या अभिनेत्याची एण्ट्री झाली आहे.

झी मराठी वाहिनीवरील 'तू तेव्हा त स्वप्निल जोशी आणि शिल्पा तुळसकर यांनी या मालिकेमध्ये सौरभ आणि अनामिकाची भूमिका साकारली आहे. सौरभ अविवाहित तर अनामिका विवाहित आहेत. मात्र अनामिकाचा नवरा तिला सोडून गेला अन् मालिकेच्या सुरुवातीपासूनच तिचा पहिला नवरा कोण? हे दाखवण्यात आलं नाही. फक्त अनामिकाच्या पहिल्या नवऱ्याच्या नावाचा उल्लेख मालिकेमध्ये करण्यात आला. शी' मालिका सध्या चांगलीच चर्चेत आहे. या मालिकेने सध्या प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे. वयाची ३५शी ओलांडलेल्या जोडप्याची कथा या मालिकेमध्ये दाखवण्यात आली आहे. अनामिका-सौरभ या जोडप्याची ही कथा आहे. सध्या हे दोघं लग्नापूर्वी एका छताखालीच म्हणजे सौरभच्या घरी राहत आहेत. पण सौरभच्या घरी अनामिका राहायला आली असता नवनवीन वाद निर्माण होताना दिसत आहेत. अशातच आता मालिकेला एक वेगळं वळण मिळणार आहे. आता तिचा पहिला नवरा आकाश जोशी सौरभच्या थेट घरी येणार आहे. झी मराठी वाहिनीने त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटद्वारे याचा प्रोमो देखील प्रदर्शित केला आहे. आकाश जोशी थेट सौरभला भेटण्यासाठी त्याच्या घरी येतो आणि त्यानंतर नेमकं काय घडतं? हे पाहणं रंजक ठरणार आहे. आकाश जोशी या पात्रासाठी मराठीसह हिंदी चित्रपटांमध्ये काम करणाऱ्या अभिनेत्याची निवड करण्यात आली आहे.



अभिनेता अशोक समर्थ हा आकाश जोशीची भूमिका साकारताना दिसेल. 'सिंघम' चित्रपटामुळे अशोक समर्थच्या चाहत्यावर्गामध्ये अधिक वाढ झाली. काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झालेल्या 'दगडी चाळ २' चित्रपटामध्येही अशोक समर्थने महत्त्वाची भूमिका साकारली. आता या मालिकेमधील त्याची नकारात्मक भूमिका प्रेक्षकांच्या पसंतीस

# जिनिलिया देशमुखला नवऱ्याकडून मिळाली ‘ही’ सर्वोत्तम भेट, अभिनेत्रीनेच केला होता खुलासा

बॉलिवूडमधील प्रेक्षकांचं लाडकं कपल म्हणून अभिनेता रितेश देशमुख आणि त्याची पत्नी जिनिलिया डिसूझा यांच्याकडे पाहिलं जातं. या दोघांची लव्हस्टोरी आणि भन्नाट केमिस्ट्री तर साऱ्यांनाच माहित आहे. बऱ्याच वेळा त्यांच्यातील हे प्रेम सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांना पहायला ही मिळतं. बॉलिवूडमधील आदर्श जोडपं म्हणून रितेश देशमुख आणि जिनिलिया डिसूझा यांच्याकडे पाहिलं जातं. रितेशसोबत लग्न झाल्यापासून जिनिलियाचा अभियन क्षेत्रातील वावर कमी झाला आहे. लग्नानंतर तिने फार कमी चित्रपटांमध्ये काम केलं. बऱ्याच वेळा हे दोघं सोशल मीडियावर एकमेकांची खिल्ली उडवताना दिसतात. त्याचप्रमाणे अनेक वेळा ते एकमेकांप्रतीचं प्रेमही व्यक्त करत असल्याचं दिसून येतं. जिनिलियाने मध्यंतरी तिच्या इंस्टाग्राम स्टोरीजवर 'आस्क मी एनीथिंग' सत्राचे आयोजन केले होते. तिने तिच्या भविष्यातील काही प्रोजेक्ट्स आणि अगदी तिच्या



वैयक्तिक आयुष्याबद्दल उत्तरे दिली. सत्रादरम्यान, एका चाहत्याने अभिनेत्रीला विचारले, 'मॅडम तुम्हाला रितेश सरांकडून मिळालेली सर्वात चांगली भेट कोणती आहे?' अभिनेत्रीने तिच्या दोन लहान मुलांचे, रियान देशमुख आणि राहिल देशमुख अशा दोघांचा फुटबॉल जर्सी घातलेला फोटो पोस्ट केला. रितेश आणि जिनिलिया यांची पहिली भेट २००३ मध्ये त्यांच्या पहिल्या बॉलिवूड चित्रपटाच्यावेळी म्हणजे 'तुझे मेरी कसम'च्या सेटवर झाली. चित्रपटाच्या चित्रीकरणाच्या दरम्यान दोघांमध्ये सुंदर मैत्री झाली होती, ज्याचे रुपांतर प्रेमात झाले. तेव्हा जिनिलियाच वय १६ होते तर रितेशचे वय २५ होते. जवळजवळ दहा वर्षे डेटिंग केल्यानंतर, या जोडप्याने शेवटी ३ फेब्रुवारी २०१२ रोजी त्यांनी लग्न केले. रियान आणि राहिल हे दोन मुलगे देखील आहेत.

## शॉर्ट न्यूज »

### विराट कोहली झाला अलिबागकर; झिराडजवळ ८ एकरवर जागेसाठी मोजले तब्बल

**अलिबाग। महाईन्यूज**

कर्णधार रोहित शर्मा पाठोपाठ भारताचा स्टार क्रिकेटपटू विराट कोहलीने गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर अलिबागमध्ये जमीन खरेदी केली आहे. झिराड परिसरात ही ८ एकर हवेशीर जागा असून येथे तो फार्महाऊस बांधणार आहे. विराटचा भाऊ विकास कोहली याने हा व्यवहार गणपतीच्या आदल्या दिवशी मंगळवारी (३० ऑगस्ट) पूर्ण केला. सहा महिन्यांपूर्वी विराट कोहली आणि पत्नी अनुष्का शर्मा यांनी झिराड येथे येऊन जागेची पाहणी केली होती. क्रिकेटच्या व्यस्त कार्यक्रमामुळे विराट कोहली यास अलिबागमध्ये येऊन जागेचा व्यवहार पूर्ण करता येत नव्हता. सध्या तो आशिया कप क्रिकेट स्पर्धेसाठी दुबईत आहे. त्यामुळे गणपतीचा आदल्या दिवसाचा मुहूर्त साधत लहान भाऊ विकास कोहली याने 'पॉवर ऑफ अटर्नी'द्वारे विराट कोहलीसाठी व्यवहार पूर्ण केलात्याच्या खेळाचे निरीक्षण करत मी शिकत राहिलो. धोनीचा खेळाकडे पाहण्याचा जो दृष्टीकोन आहे.

### अमेरिकन खुली टेनिस स्पर्धा

# रॅडूकानू पहिल्याच फेरीत गारद; ओसाकाचाही पराभव

### नदाल, अल्कराझ, हुरकाझची आगेकूच

**।न्यूयॉर्क । महाईन्यूज ।**



यंदाच्या अमेरिकन खुल्या ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत महिला विभागातील सनसनाटी निकालांची मालिका दुसऱ्या दिवशीही कायम राहिली. गतविजेत्या एमा रॅडूकानू आणि जपानच्या चार ग्रँडस्लॅम विजेत्या नाओमी ओसाकाचे आव्हान पहिल्याच फेरीत संपुष्टात आले. त्याच वेळी पुरुषांमध्ये राफेल नदाललाही पहिल्या विजयासाठी झगडावे लागले.

ब्रिटनची ११वी मानांकित रॅडूकानू २०१७ नंतर अमेरिकन स्पर्धेत पहिल्याच फेरीत गारद होणारी पहिली गतविजेती खेळाडू ठरली. २०१७ मध्ये अँजेलिक कर्बरला पराभवाचा सामना करावा लागला होता. गतवर्षी रॅडूकानूने पात्रता फेरीतून येताना सलग १० सामने जिंकून स्पर्धेचे विजेतेपद मिळविले होते. यंदा मात्र ती अपेक्षांच्या दडपणाखाली दिसून आली. पहिल्या फेरीच्या सामन्यात फ्रान्सच्या ॲलिझ कॉर्नेटविरुद्ध तिचा खेळ कधीच बहरला नाही. कॉर्नेटने रॅडूनाकूचा ६-३, ६-३ असा सहज पराभव केला. ओसाकालाही पहिल्या फेरीच्या सामन्यात चांगला खेळ करण्यात अपयश आले. अमेरिकेच्या १९व्या मानांकित डॅनिएले कॉलिन्सने अमेरिकन स्पर्धेतील दोन वेळच्या विजेत्या ओसाकाला ७-६ (७-५), ६-३ असे सरळ सेटमध्ये नमवले. कॉलिन्सने यंदा ऑस्ट्रेलिया खुल्या स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती. दुसऱ्या फेरीत तिची गाठ स्पेनच्या ख्रिस्टिना बुसाशी पडणार आहे. अमेरिकन स्पर्धेत कारकीर्दीतील ८०वा विजय मिळविण्याचे अनुभवी व्हिनस विल्यम्सचे स्वप्न भंगले. बेल्जियमच्या ॲलिसन व्हॅन ओयट्व्हांकने व्हिनसला ६-१, ७-६ (७-५) असे पराभूत केले. पात्रता फेरीतून आलेल्या फ्रान्सच्या क्लारा बुरेलने विम्बल्डन विजेत्या एलिना रिबाकिनाला ६-४, ६-४ असा पराभवाचा धक्का दिला. पुरुष एकेरीत नोव्हाक जोकोविचच्या गैरहजेरीत जेतेपदासाठी प्रमुख दावेदार असलेल्या नदालने विजयी सुरुवात केली. मात्र त्याला चार सेटपर्यंत झुंजावे लागले. पहिलाच सेट त्याने गमवला होता. मात्र त्यानंतर त्याने नियंत्रित खेळ करून ऑस्ट्रेलियाच्या रिंकी हिजीकाटावर ४-६, ६-२, ६-३, ६-३ अशी सरशी साधली. आता त्याची फॅबिओ फॉग्निनीशी गाठ पडेल.

# आगामी भारत दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलिया संघाची निवड;



**। न्यूयॉर्क। महाईन्यूज ।**

आगामी भारत दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाची निवड झाली आहे. या दौऱ्या दरम्यान भारत ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन टी-२० सामने खेळवण्यात येणार आहे. या संघात सिंगापूरमध्ये जन्मलेला आक्रमक फलंदाज टीम डेव्हिडचा समावेश करण्यात आला आहे. तर डेव्हिड वॉर्नला भारतीय दौऱ्यातून विश्रांती देण्यात आली आहे. सप्टेंबरमध्ये ऑस्ट्रेलिया संघ भारत दौऱ्यावर सप्टेंबर महिन्यात ऑस्ट्रेलिया संघ भारत दौऱ्यावर येणार आहे. या दौऱ्यात तीन टी-२० सामने खेळवण्यात येईल. २० सष्टेबर रोजी पहिला सामना मोहालीत, २५ सष्टेबर रोजी नागपूर, तर तीसरा सामना हैदराबादमध्ये होणार आहे.

### टीम डेव्हिडचा समावेश ऑस्ट्रेलियन संघात समावेश

भारत दौऱ्यासाठी सिंगापूरमध्ये जन्मलेल्या टीम डेव्हिडचा समावेश करण्यात आला आहे. डेव्हिडने २०१९ आणि २०२२ मध्ये सिंगापूरसाठी १४ टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. डेव्हिडचे आई-वडील ऑस्ट्रेलियन आहेत, पण त्याचा जन्म सिंगापूरमध्ये झाला आहे. इंडियन प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सने या वर्षाच्या सुरुवातीला डेव्हिडला ८.२५ कोटी रुपयांना खरेदी केले होते.

### भारत दौऱ्यासाठी ऑस्ट्रेलिया टी-20 संघ

ॲरॉन फिंच (कर्णधार), पॅट कमिन्स (उपकर्णधार), ॲश्टन अगर, टीम डेव्हिड, जोश हेझलवूड, जोश इंग्लिस, मिचेल मार्श, ग्लेन मॅक्सवेल, केन रिचर्डसन, स्टीव्हन स्मिथ, मिचेल स्टार्क, मार्कस स्टॉइनिस, मॅथ्यू वेड, ॲडम झाम्पा

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
96577 67000

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही